## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये आदेश

जा.क्र.मुंबई/एलवि/उनि/बी/का.क.७७(अ)/हौ/२०१८/५६४

का र्या ल य

उपनिबंधक, सहकारी संस्था, एल-विभाग, मुंबई.
कक्ष क्र ३११,कोकण भवन, तिसरा मजला,
नवीमुंबई-४०० ६१४. दिनांक :-०२/०४/२०१८.

वाचावे :- १) संस्थेचे पत्र दि.१९.०३.२०१८.
२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) मधील तरतुद.
३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम (सुधारणा अध्यादेश २०१३).

ज्याअर्थी, शिवदर्शन को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि, शिवाजी नगर, मोहिली व्हीलेज, साकीनाका, मुंबई ४०० ०७२. ही संस्था महाराष्ट्र सहाकरी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ अन्वये नोंदणीकृत संस्था असून तिचा नोंदणी क्रमांक बीओएम/डब्ल्युएल/एचएसजी/(टिसी)/६७९२/९३-९४ असा आहे. सदरची संस्था या कार्यालयाच्या वैधानिक कार्यकक्षेत येत आहे. आणि,

ज्याअर्थी, उपरोक्त संस्थेचे सेक्रेटरी यांनी उपरोक्त वाचावे क्र १ नुसार तसेच या कार्यालयात समक्ष उपस्थित राहुन या कार्यालयाचे असे निदर्शनास आणुन दिले आहे की, त्यांचे संस्थेतील एकुण ०५ समिती सदस्यांनी त्यांचे संचालक मंडळ सदस्यत्वाचे राजिनामे दिलेले आहेत. संस्थेचे सर्वसाधान मतदार संघातुन ०५, महिला राखीव ०२ अशा एकुण ०७ समिती सभासदांची निवड झालेली असुन अनुसुचित जाती/जमाती, इतर मागासवर्ग प्रवर्ग व विशेष मागासवर्ग प्रवर्ग या प्रवर्गातील प्रत्येक ०१ अशी एकुण ३ पदे रिक्त आहेत. कार्यरत असणा-या एकुण ०७ समिती सदस्यांपैकी एकुण ०५ समिती सदस्यांनी त्यांचे राजिनामे संस्थेचे सेक्रेटरी यांना दिलेले असुन सदरचे राजिनामे दि.१३.०३.२०१८ रोजीच्या सर्वसाधारण सभेत मंजुर केलेले आहे. आणि,

ज्याअर्थी, संस्थेच्या समितीने राजिनामा दिलेला असल्याने संस्थेच्या व्यवस्थपनामध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या अनुषंगाने करण्यात आलेल्या महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश,२०१३ मधील कलम ७७ अ मधील (ख) खंड (ब१) नुसार समितीच्या रचनेत दोष निर्माण झाला आहे किंवा समितीने कार्य करण्याचे बंद केले आहे व व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झालेली आहे असे नमुद केलेनुसार संस्था समितीने कार्य करण्याचे बंद केलेले आहे. सबब संस्थेचे संपूर्ण दैनंदिन कामकाज ठप्प झाल्याने सभासदांचे हिताचे दृष्टीने दैनंदिनी कामकाज करण्यासाठी तातडीने प्राधिकृत अधिका-यांची नियुक्ती करणे आवश्यक असल्याचे अशी माझी खात्री झाल्याने नोटीस न देता मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**-: आ दे श :-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये मी, शिरीष सपकाळ, उपनिबंधक, सहकारी संस्था, एल विभाग,मुंबई आदेश देत आहे.की, शिवदर्शन को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि, शिवाजी नगर, मोहिली व्हीलेज, साकीनाका, मुंबई ४०० ०७२. या संस्थेच्या एकुण ०५ समिती सदस्यांनी त्यांचे पदाचे राजिनामे दिलेले असल्याने संस्थेच्या व्यवस्थापना मध्ये पोकळी निर्माण झालेली असुन संस्थेची व्यवस्थापक समिती बरखास्त करुन त्या ऐवजी खालील प्रमाणे श्री.शरद घोलप, यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून सहा महिन्यासाठी नेमणूक करीत आहे. प्राधिकृत अधिकारी यांनी संस्थेच्या दप्तराचा ताबा घेऊन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा. मेहनतान्याचे आदेश अलाहिदा निर्गमित करण्यांत येतील.

हा आदेश दि.०२/०४/२०१८ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी व कार्यालयीन मुद्रेसह दिला आहे.

(शिरीष सपकाळ )
उपनिबंधक,
सहकारी संस्था, एल विभाग,मुंबई

प्रति,
१.सेक्रेटरी शिवदर्शन को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि, शिवाजी नगर, मोहिली व्हीलेज, साकीनाका,मुंबई ७२.
२/-त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी संस्थेच्या मालमत्तेचा व दप्तराचा ताबा प्राधिकृत अधिकारी यांचेकडे सुपुर्तकरावा.
२.(१).श्री.शरद घोलप, प्रमाणित लेखापरिक्षक व प्राधिकृत अधिकारी.
२/- त्यांना कळविण्यांत येते की, त्यांनी संस्थेचे सेक्रेटरी यांचे कडुन संस्थेच्या दप्तराचा ताबा घेवुन विहित मुदतीत निवडणुकीची प्रक्रिया राबवावी.
३.शाखाधिकारी, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि/महाराष्ट्र राज्य सहकारी बँक--------------

उपनिबंधक,
सहकारी संस्था, एल विभाग,मुंबई

Scanned by CamScanner